महाराष्ट्र शासन

क्रमांक : वैखप्र-१६१४/(२०४/१४)/टिएनटी-५
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ एप्रिल, २०१५.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर.

विषय : वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी जिल्हा वैद्यकीय अधिक्षक (जिल्हा शल्य चिकित्सक) यांच्या प्रमाणपत्राबाबत.

उपरोक्त विषयांबाबत कळविण्यात येते की, राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके शिक्षणाधिकारी, विभागीय उपसंचालक व विभागीय तपासणी समितीमार्फत शासनास सादर केली जातात. परंतु सदर बिले विभागीय स्तरावर तपासणी करताना एखाद्या कर्मचाऱ्याने शासकीय तसेच शासन मान्य रुग्णालयात उपचार घेतले असतील व जिल्हा वैद्यकीय अधिक्षक (जिल्हा शल्य चिकित्सक) यांचे प्रमाणपत्र जोडले नसेल तर त्रुटी काढून परत केली जातात.

याबाबत अनेक विधानमंडळ सदस्य व कर्मचाऱ्यांनी शासनास तक्रार केल्याने आपणास कळविण्यात येते की, शासकीय तसेच खाजगी रुग्णालयास शासन मान्यता देण्यात आली असल्यास अशा मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असल्यास जिल्हा वैद्यकीय अधिक्षक (जिल्हा शल्य चिकित्सक) यांनी प्रमाणित करण्याची आवश्यकता नाही.

( नि. पी. थोरात )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन